RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ५८] बुधवार, मे २९, २०१९/ज्येष्ठ ८, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२७**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मे २०१९

**अधिसूचना**

कारखाने अधिनियम, १९४८.

क्रमांक एफएसी.२०१८/प्र.क्र. २६२/कामगार-४.—कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) च्या कलम ४९ ची पोट-कलमे (१) व (२) तसेच कलम ११२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कल्याण अधिकारी (कर्तव्ये, अर्हता आणि सेवाशर्ती) नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ११५ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

**नियम**

१. या नियमांना, महाराष्ट्र कल्याण अधिकारी (कर्तव्ये, अर्हता आणि सेवाशर्ती) (पहिली सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कल्याण अधिकारी (कर्तव्ये, अर्हता आणि सेवाशर्ती) नियम, १९६६ (यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा केला आहे) च्या नियम ३ मध्ये पोट नियम (१) ऐवजी पुढील उप नियम दाखल करण्यात येईल,

" (१) एखादी व्यक्ती जर,—

(एक) यासंबंधात राज्य शासनाने मान्यता दिलेली सामाजिक शास्त्रामधील पदवी किंवा पदविका मिळविली असल्याखेरीज, आणि

(दोन) तिला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याखेरीज,

ती व्यक्ती कल्याण अधिकारी, अपर कल्याण अधिकारी किंवा सहायक कल्याण अधिकारी म्हणून नेमणूक होण्यास पात्र असणार नाही, ”

३. मुख्य नियमांतील नियम ३ (अ) वगळण्यात येईल.

४. मुख्य नियमांतील नियम ५, वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

**डॉ. श्री. ल. पुलकुंडवार,**
शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of Artical 348 of the constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. FAC-2018/C.R. 262/Lab-4, dated 29th May 2019 is hereby published under the authority of the Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. S. L. PULKUNDWAR,
Deputy Secretary to Government.

---

**INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 29th May 2019

*NOTIFICATION*

THE FACTORIES ACT, 1948.

No. FAC.2018/C.R.262/Lab-4.—In exercise of the powers conferred by section 112 read with sub-section (*1*) and (*2*) of section 49 the Factories Act, 1948 (63 of 1948), in its application to the state of Maharashtra and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend The Maharashtra Welfare Officers (Duties, Qualifications and Conditions of Service) Rules, 1966 the same having been previously been published as required by sub-section (*1*) of section 115 of the said Act, namely :—

*Rules*

1. These rules may be called The Maharashtra Welfare Officers (Duties, Qualification and Conditions of Service) (1st Amendment) Rules, 2019.

2. In rule 3 of the Maharashtra Welfare Officers (Duties, Qualification and Conditions of Service) Rules, 1966 (hereinafter referred to as "the principal Rules"), for sub rule (1), the following sub rule shall be substituted namely :—

"(1) A person shall not be eligible for appointment as a Welfare Officer, Additional Welfare Officer or Assistant Welfare Officer, unless he :—

(*i*) has obtained a degree or diploma in social science recognized by the State Government in this behalf, and

(*ii*) has adequate knowledge of Marathi language."

3. Rule 3(A) of the Principal Rules shall be deleted.

4. Rule 5 of the Principal Rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. S. L. PULKUNDWAR,
Deputy Secretary to Government.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.